MHSO110044102017

दाखल दिनांक : २०.११.२०१७

नोंदणी दिनांक : २२.११.२०१७

निकाल दिनांक: १२.०६.२०२६

कालावधी : वर्षे, महिना, दिवस
०८ ०६ २३

| | |
|---|---|
| | **माळशिरस येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात**<br>**ता. माळशिरस, जि. सोलापूर**<br>(**पिठासीन अधिकारी – यु. बी. पेठे**)<br>**न्यायनिर्णय**<br>**(घोषित दिनांक १२/०६/२०२६)**<br>**नियमित फौजदारी खटला क्र. ५३३/२०१७, नि.क्रं. ६४**<br>**गु.र.नं. १५२/२०१७ अकलूज पोलीस ठाणे, ता.माळशिरस** |
| फिर्यादी | सरकार |
| अभियोग पक्षातर्फे सहा. अभियोक्ता | श्री. पी. एस. कश्यप. |
| आरोपी | १. विठ्ठल भानुदास गायकवाड,<br>वय – ४७ वर्षे, धंदा – चालक,<br>रा. गिरझणी, ता. माळशिरस, जि. सोलापूर.<br>२. रामचंद्र भानुदास गायकवाड,<br>वय – ४८ वर्षे, धंदा – शेती,<br>रा. गिरझणी, ता. माळशिरस, जि. सोलापूर.<br>३. प्रविण रामचंद्र गायकवाड,<br>वय– २४ वर्षे, धंदा–शेती, |

| | |
|---|---|
| | रा.गिरझणी, ता. माळशिरस, जि. सोलापूर.<br>४. गणेश शिवाजी फुके,<br>वय– २१ वर्षे, धंदा– शेती,<br>रा. बागेचीवाडी, ता. माळशिरस, जि. सोलापूर.<br>५. किरण शिवाजी फुके,<br>वय– २२ वर्षे, धंदा–शेती,<br>रा. बागेचीवाडी, ता. माळशिरस, जि. सोलापूर.<br>६. राजाराम संपती गायकवाड,<br>वय– ४७ वर्षे, धंदा– शेती,<br>रा. बागेचीवाडी, ता. माळशिरस, जि. सोलापूर.<br>७. चैतन्य विठ्ठल गायकवाड,<br>वय– १९ वर्षे, धंदा– शिक्षण,<br>रा. वाघवस्ती, गिरझणी, ता. माळशिरस |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | श्री. व्ही. आर. शेख |

**भाग – ब**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | ०९.०४.२०१७ |
| पहिली खबर दिनांक | १९.०४.२०१७ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | २०.११.२०१७ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ३०.०९.२०१९ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २०.०१.२०२६ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | – |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | १२.०६.२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्त |

## आरोपीचा तपशील

| आरोपीची श्रेणी | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | अधिनियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली | दिलेली शिक्षा | सुनावणीदरम्यान जेलमध्ये असल्याचा काला वधी कलम ४२ ८ सीआर पीसी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | विठ्ठल भानुदास गायकवाड | १०.०४.२०१७ | १३.०४.२०१७ | भादवि ३२६, ५०४,५०६ ३४ प्रमाणे | निर्दोष | निरंक | निरंक |
| २ | रामचंद्र भानुदास गायकवाड | १०.०४.२०१७ | १३.०४.२०१७ | | | | |
| ३ | प्रवीण रामचंद्र गायकवाड | १०.०४.२०१७ | १३.०४.२०१७ | | | | |
| ४ | गणेश शिवाजी फुके | १०.०४.२०१७ | १३.०४.२०१७ | | | | |
| ५ | किरण शिवाजी फुके | १०.०४.२०१७ | १३.०४.२०१७ | | | | |
| ६ | राजाराम संपती गायकवाड | १०.०४.२०१७ | १३.०४.२०१७ | | | | |
| ७ | चैतन्य विठ्ठल गाकयवाड | १०.०४.२०१७ | १३.०४.२०१७ | | | | |

## भाग – क

## अभियोग पक्षाच्या साक्षीदारांची यादी/बचाव/न्यायालयाचे साक्षीदार

### अ. अभियोग

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | प्रसाद सुरज डांगे | खबरी. |
| अ.सा.क्र.२ | सुनिता सुरेश डांगे | साक्षीदार |
| अ.सा.क्र. ३ | सुरेश दशरथ डांगे | साक्षीदार |

### ब. बचाव साक्षीदार, इतर

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| डि.सा.क्र.१ | निरंक | निरंक |

### क. कोर्ट साक्षीदार, इतर

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| सी.सा.क्रं.१ | निंरक | निरंक |

## अभियोग पक्षाचे/ बचाव /कोर्ट निशाणी

### अ. अभियोग

| अनु.क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | ६० | जबाब. |

### ब.बचाव

| अनु.क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

### क.कोर्ट निशाणी

| अनु.क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

### ड.मुद्देमाल

| अ.क्र | मुद्देमाल क्र | तपशील |
|---|---|---|
| १ | एम. आर. क्र. ४५/२०१७ | १. मुरमाचे सहा दगड.<br>२. फरशीवर पडलेले लाल डाग कापसाने पुसुन घेतलेले सॅम्प्ल. |
| २. | एम. आर. क्र. ४६/२०१७ | १. एक निळसर रंगाची जिनची पॅंट<br>२. एक चॉकलेटी रंगाचा फुल बाहयाचा शर्ट<br>३. एक जिन पॅंट तिचे बेल्टवर pilgon असे लिहिलेले<br>४. एक हिरव्या रंगाचा फुल बाहयाचा शर्ट<br>५. एक डार्क हिरव्या कलरची फुल पॅंट |

| | | |
|---|---|---|
| | | ६. एक फुलबाहयाचा बारीक चौकडयाचा फुल शर्ट<br>७. एक राखाडी कलरची फुल पँट<br>८. एक भगव्या कलरचा कॉलरचा टी–शर्ट<br>९. एक चॉकलेटी रंगाची पँट<br>१०. एक पिवळे रंगाचा हाफ बाहयाचा शर्ट<br>११. एक ग्रे कलरची फुल पँट, एक गुलाबी रंगाचा फुल बाहयाचा शर्ट<br>१२. एक निळया रंगाची जिन पँट<br>१३. एक फुल बाहयाचा ओपन शर्ट लाल, हिरव्या व पांढ–या रंगाचा चौकडा शर्ट. |
| ३. | एम. आर. क्र. ४७/२०१७ | १. एक चॉकलेटी कलरचा शर्ट बारीक चौकडया असलेला<br>२. एक निळया रंगाची जिनची पँट<br>३. एक पांढरे रंगाचा हाफ बाहयाचा ओपनशर्ट<br>४. एक पांढरे रंगाचा शान्डो बनियन<br>५. एक हिरवट रंगाचा ब्लाऊज<br>६. एक हिरवट रंगाची निळसर फुलाचे डिझाईन असलेली साडी. |
| ४. | एम. आर.क्र. ४८/२०१७ | १. एक बजाज कंपनीची मोटारसायकल लाल रंगाची तिचा आरटीओ क्र. एम. एच. १२ बी.टी. ५२४३<br>२. एक हिरोहोन्डा सीडी डॉन कंपनीची काळया रंगाची मोटारसायकल तिचा आरटीओ क्र. एम.एच. ४५ आर. ५१९१<br>३. एक टीव्हीएस स्टार कंपनीची काळया रंगाची मोटारसायकल तिचा आरटीओ क्र. एम. एच. ४५ एम. ८८९६ |

| | | |
|---|---|---|
| | | ४. एक होन्डा शाईन कंपनीची काळया रंगाची मोटारसायकल तिचा आरटीओ क्र. एम. एच. ४५ वाय. २४५ |
| ५. | एम.आर.क्र. ४९/२०१७ | १. एक लोखंडी पिळयाचा गज.<br>२. एक बांबुची काठी सुमारे ३फुट ४ इंच<br>३. एक बांबुची काठी सुमारे ३ फुट १ इंच<br>४. एक बांबुची काठी सुमारे २ फुट ७ इंच<br>५. एक लाकडी काठी सुमारे ३ फुट ४ इंच. |

## न्यायनिर्णय
## (दिनांक १२ जून २०२६ रोजी घोषित)

प्रस्तुत खटला आरोपींविरूध्द त्यांनी भारतीय दंड विधान, १८६० (या पुढे भा.दं.वि. म्हणून नमूद केलेले) चे कलम १४३, १४७, ३२६, ३२५, ३२४, ३२३, ४५२, ३५४, ५०४, ५०६ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केलेबाबत दाखल करणेत आला आहे.

## अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात पुढीलप्रमाणे:–

(२) प्रसाद सुरेश डांगे (यानंतर थोडक्यात खबरी असे नमूद) यांचे घराजवळ आरोपी क्र. १ कुटुंबासह राहत असून तो खबरीचा नातेवाईक आहे. आरोपी क्र. १ ला स्वप्नजा नावाची मुलगी आहे. आरोपी क्र. १ चा मुलगा चैतन्य खबरीचा चांगला मित्र असून त्यांचे एकमेकांच्या घरी जाणे येणे आहे. आरोपी क्र. १ ची मुलगी स्वप्नजा व खबरीचा भाऊ

प्रशांत यांचे घटनेच्या अडीच वर्षापासून प्रेम संबंध होते. त्यांचे प्रेम संबंध घटनेच्या तीन महिन्यापूर्वी दोन्ही घरातील सदस्यांना समजले होते. त्यावेळी वडीलधारी लोकांची बैठक घेऊन तो विषय संपविला होता व यापुढे असे प्रकार करायचे नसल्याबाबत खबरीचा भाऊ प्रशांत यास ताकीद दिली होती. तरीदेखील प्रशांत व स्वप्नजा यांचे प्रेम संबंध सुरू होते.

(३) दिनांक ०७.०४.२०१७ रोजी खबरीचा भाऊ प्रशांत व खबरीचा मित्र मिलिंद गायकवाड हे पानीव येथे गेले होते. त्यावेळी खबरीचा भाऊ प्रशांत आरोपी क्र. १ ची मुलगी स्वप्नजा सोबत तिच्या मामाच्या घराजवळ बोलताना मिळून आला होता. त्यावेळी त्यांना मारहाण झाली होती तेव्हा दोघांनी एकमेकांविरुद्ध पोलीस ठाणे तक्रार दिली होती. तेव्हा सुद्धा वडीलधारी लोकांनी भांडणाबाबत आपसात मिटवा मिटवी केली होती. दिनांक ०८.०४.२०१७ रोजी खबरीचा भाऊ प्रशांत हा कामानिमित्त पुणे येथे निघून गेला.

(४) खबरीच्या घरी देवाची कावड येणार असल्याने जेवणाच्या पंगतीचे साहित्य घेऊन येण्याकरिता दिनांक ०९.०४.२०१७ रोजी सकाळी ९.३० वाजताच्या सुमारास खबरी त्याचा मित्र मिलिंद गायकवाड यांच्यासोबत मोटरसायकलवर अकलूज येथे आले होते. ते साहित्य आणण्याकरिता त्यांचे चुलते सुकुमार डांगे यांच्याकडे औद्योगिक वसाहतीकडे निघाले होते. त्यावेळी खबरीचा मित्र गणेश माने याचा खबरीला फोन आला व त्याने सांगितले की गायकवाड ची माणसे त्याचा शोध घेत आहे. तरी देखील खबरी पुढे

निघून गेला त्यावेळी धवल श्रीराम मंदिराचे पाठीमागे नौशाद कंपनीजवळ दुपारी १२.३० वाजता अचानक समोरून दोन मोटरसायकली आल्या. त्यावर आरोपी बसलेले होते. त्यांच्या हातामध्ये लाकडी दांडके व लोखंडी गज होते. त्यांना पाहून खबरीने गाडी थांबवली असता आरोपी क्र. ५ ने खबरीला उद्देशून ''आई घाल्या लय माज आलाय का, तुला बघतोय'' असे म्हणून खबरीला लाथ मारली. त्यामुळे खबरी खाली पडला तेव्हा आरोपी क्र. ५ ने त्याच्या हातातील लोखंडी गजाने खबरीच्या उजव्या पायाच्या नडगीवर जोरात मारले. तेव्हाच आरोपी क्र. ३ व आरोपी क्र. ६ यांनी त्यांच्या हातातील लाकडी दांडक्याने खबरीच्या दोन्ही पायावर, छातीवर, पाठीवर व डोक्यात मारहाण करण्यास सुरुवात केली. तेव्हा आरोपी क्र. १, २, ४, ५ यांनी खबरीला लाथा बुक्क्यांनी पोटात व पाठीत तोंडावर मारहाण केली. त्यामध्ये खबरीच्या उजव्या पायाच्या नडगीवर जबर मार लागला तसेच पाठीत, पायाच्या बोटांवर, छातीवर, दोन्ही हाताच्या पंजावर, उजव्या हाताच्या मनगटावर मारहाणी मध्ये वळ उमटले तसेच डोक्यात टेंगूळ आले.

(५) तसेच खबरीचा मित्र मिलिंद गायकवाड याला देखील आरोपींनी लाकडी काठ्यांनी व लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. त्यामध्ये मिलिंदच्या दोन्ही हाताच्या मनगटावर दंडावर, बोटाला, पाठीत व डाव्या मांडीवर, डाव्या गुडघ्यावर मारहाणी मध्ये वळ उमटले. आरोपी खबरी व त्याचा मित्र मिलिंद यांना मारहाण करत असताना शिवीगाळ करत होते. त्यानंतर आरोपींनी खबरी व त्याचा मित्र मिलिंद यांना मोटरसायकलवर बसून त्यांच्या घरी

आणले, तेथे देखील आरोपी त्यांना मारहाण करत होते. तेव्हा आरोपी क्र. २, ३, ५ खबरीच्या घरात घुसले व त्यांनी त्यांच्या जवळील काठ्यांनी खबरीची आई सुनिता (अ.सा क्र. २) व खबरीचे वडील सुरेश (अ. सा.क्र. ३) यांना मारहाण केली व बाहेर ओढले. त्यानंतर घराच्या अंगणात पुन्हा लाथाबुक्क्याने मारहाण करून शिवीगाळ केली. तेव्हा आरोपी क्र. २ ने त्यांना उद्देशून ''आई घाल्यांनो आमच्या पोरीच्या मागे लागताय का, तुम्हांला सांगितलेले समजत नाही का परत आमच्या पोरीचा नाद केला तर तुकडे करीन'' अशी धमकी दिली. त्यानंतर तेथे पोलिसांची गाडी आली. खबरी, सुनिता (अ.सा क्र. २) व खबरीचे वडील सुरेश (अ. सा.क्र. ३) यांना उपजिल्हा रुग्णालय अकलूज येथे उपचाराकरिता नेले. त्यानंतर पुढील उपचाराकरिता खबरी कदम मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल येथे दाखल झाला. तेथे उपचार घेत असताना अकलूज पोलिसांनी खबरीचा जबाब नोंदविला.

**(६)** खबरीचे जबाबावरून आरोपींविरूध्द अकलूज पोलीस ठाणे येथे गु.नों.क्र. १५२/२०१७, भारतीय दंड संहिता कलम १४३, १४७, ३२६, ३२५, ३२४, ३२३, ४५२, ३५४, ५०४, ५०६ सह कलम १४९ अन्वये दाखल करणेत आला. प्रस्तुत गुन्हयाचा तपास पोहेकॉ./४७५ एस. डी. हेंबाडे यांनी केले. त्यांनी तपासकामी घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला. घटनेसंबंधीत साक्षीदारांकडे चौकशी करून, त्यांची तपास टिपणे नोंदविली. त्यांनी केलेल्या एकंदर तपासामध्ये आरोपींनी गुन्हा केल्याचे निष्पन्न

झाल्याने, त्यांचेविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

(७) प्रस्तुतकामी आरोपी हजर झालेनंतर त्यांचेविरूध्द नि.क्र. ४४ येथे भारतीय दंड संहिता, कलम १४३, १४७, ३२६, ३२५, ३२४, ३२३, ४५२, ३५४, ५०४, ५०६ सह कलम १४९ अन्वये दोषारोप ठेवला. सदरचा दोषारोप आरोपींना मराठी भाषेत वाचून, समजावून सांगितला असता, त्यांनी दोषारोप (नि.क्र. ४५ ते ५१) नाकबूल करून खटला पुढे चालविणेची विनंती केली.

(८) आरोपींच्या विरुध्द कुठलाही पुरावा मिळून न आल्याने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ (भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५१) अन्वये निवेदन क्षम्य करण्यात आले. खबरी व आरोपी यांनी आपसात न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याबाबतचे समेट पत्र (नि.क्र. ५८) अभिलेखावर दाखल केल्याने व खबरीच्या सुचनापत्रावरुन अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

(९) दोन्ही पक्षांचे म्हणणे व पुरावा यावरून खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष पुढे दिलेल्या सविस्तर कारणांसाठी खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आरोपींनी समान उद्धेशाच्या पुरःसरणार्थ गैरकायदयाची मंडळी जमवून आरोपींनी खबरी व साक्षीदार मिलींद यांना काठीने व लोखंडी गजाने मारहाण करून फिर्यादीचे उजवे पायाचे हाड मोडून इच्छापुर्वक जबर दुखापत केली, असे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय ? | **नाही.** |
| २. | आरोपींनी समान उद्धेशाच्या पुरःसरणार्थ गैरकायदयाची मंडळी जमवून खबरी व इतर साक्षीदार यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन जबर दुखापत केली, असे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय ? | **नाही.** |
| ३. | आरोपींनी समान उद्धेशाच्या पुरःसरणार्थ गैरकायदयाची मंडळी जमवून खबरी व साक्षीदार मिलींद यांना काठीने व लोखंडी गजाने मारहाण करून इच्छापूर्वक दुखापत केली, असे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय ? | **नाही.** |
| ४. | आरोपींनी समान उद्धेशाच्या पुरःसरणार्थ गैरकायदयाची मंडळी जमवून खबरी व इतर साक्षीदार यांना लाथाबुक्क्यंनी मारहाण करून इच्छापूर्वक दुखापत केली, असे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय ? | **नाही.** |
| ५. | आरोपींनी समान उद्धेशाच्या पुरःसरणार्थ गैरकायदयाची मंडळी जमवून दुखापत करण्याच्या उद्धेशाने खबरीच्या घरात घुसून खबरी व इतर साक्षीदारांना मारहाण केली, असे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय ? | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| ६. | आरोपींनी समान उद्देशाच्या पुरःसरणार्थ गैरकायदयाची मंडळी जमवून साक्षीदार सुनिता हिचे अंगावर बसून तिचे अंगावरील कपडे फाडून व छाती दाबून तिचा विनयभंग केला, असे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय ? | नाही. |
| ७. | आरोपींनी समान उद्देशाच्या पुरःसरणार्थ गैरकायदयाची मंडळी जमवून खबरी व साक्षीदार यांचा उद्देशपुर्वक अपमान करून, त्यायोगे त्यांना प्रक्षोभित केले व त्या प्रक्षोभनामुळे त्यांचेकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा अगर अपराध घडावा असे कृत्य केले, असे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे काय? | नाही. |
| ८. | आरोपींनी समान उद्देशाच्या पुरःसरणार्थ गैरकायदयाची मंडळी जमवून खबरी व साक्षीदार यांना दमदाटी व धाकदपटशा केला, असे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय ? | नाही. |
| ९. | आरोपींनी समान उद्देशाच्या पुरःसरणार्थ एकत्रीत येवुन गैरकायदयाची मंडळी स्थापन केली व त्यावेळी सर्व आरोपी गैरकायदयाच्या मंडळीचे सभासद होते, असे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय ? | नाही. |
| १०. | आरोपींनी समान उद्देशाच्या पुरःसरणार्थ एकत्रीत येवुन गैरकायदयाची मंडळी स्थापन करुन सदर ठिकाणी बळाचा वापर करुन दंगा केला, असे अभियोगपक्षाने | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | शाबीत केले आहे काय ? | |
| **११.** | आरोपींनी समान उद्देशाच्या पुरःसरणार्थ एकत्रीत येवुन गैरकायदयाची मंडळी स्थापन करुन सदर ठिकाणी काठी व लोखंडी गज यासारख्या घातक हत्यारनिशी दंगा केला, असे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय ? | **नाही.** |
| **१२.** | आरोपींना कोणत्या अपराधाबाबत सिध्ददोषी ठरविता येईल ? | **कोणत्याही नाही.** |
| **१३.** | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र.१ ते १२ करिता** :

**(१०)** सदरील मुद्दे हे एकमेकांशी संलग्न असल्याने आणि अभियोग पक्षाने त्यावर सादर केलेला पुरावा संयुक्त असल्याकारणाने, सदरील सर्व मुद्दे एकत्रितरित्या विवेचनासाठी घेतलेले आहेत. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणात आलेल्या साक्षीपुराव्यांचे अवलोकन केले. प्रस्तुत खटल्यात अभियोग पक्षाने असे सिध्द करणे आवश्यक आहे की, आरोपींनी खबरी (अ.सा.क्रं.१), खबरीची आई सुनिता (अ.सा.क्र.२) व सुरेश (अ.सा.क्र.३) यांना लोखंडी गज व काठीने मारहाण करुन जबर दुखापत केली.

**(११)** खबरीने (निशाणी क्रमांक ५९ प्रमाणे) न्यायालयात साक्षी दिली की

घटनेच्या वेळी आरोपी व त्याच्यामध्ये गैरसमजातून बोलचाल झाली होती. या व्यतिरिक्त काही घडले नव्हते. खबरी मोटरसायकल वरून पडल्याने त्याला मार लागला होता. तेव्हा रागाच्या भरात तो दवाखान्यात भर्ती असताना पोलिसांना त्याने जबाब दिला होता. खबरीने घटनेची पहिली वर्दी वर त्याची सही असल्याचे मान्य केले परंतु त्यातील मजकूर नाकारला.

(१२) सुनीता (अ.सा.क्र.२) व सुरेश (अ.सा.क्र.३) यांनी सुद्धा घटनेच्या वेळी आरोपी व त्यांच्यामध्ये बोलचाल झाली होती या व्यतिरिक्त काही घडले नसल्याचे सांगितले.

(१३) खबरी, सुनीता (अ.सा.क्र.२) व सुरेश (अ.सा.क्र.३) यांनी घटनेच्या वेळी आरोपींनी त्यांना मारहाण केल्याचा मजकूर नाकारला. जखमी मिलिंद गायकवाड व त्याची पत्नी स्वाती यांना साक्षी आदेशिका काढले असता ते गावामध्ये मागील दोन वर्षापासून राहण्यात नसल्याबाबतचा पोलिसांचा अहवाल(निशाणी क्रमांक ६३ प्रमाणे) गावातील सरपंचांच्या दाखल्या सहित प्राप्त झाला.

(१४) सबब, खबरी, सुनीता (अ.सा.क्र.२) व सुरेश (अ.सा.क्र.३) च्या एकंदर पुराव्यातील वर नमूद तफावती व विसंगतींचा विचार करता, त्याबाबत साशंकता निर्माण होत आहे. तसेच खबरी (अ.सा.क्रं.१), सुनीता (अ.सा.क्र.२) व सुरेश (अ.सा.क्र.३) यांचा पुरावा व त्यांच्या स्वतःचे तपास टिपणाशी सुसंगत नसल्याने व वर नमूद तफावती तथा

विसंगतीमुळे तो आरोपींविरूध्द निश्चित केलेले दोषारोप शंकेपलीकडे सिध्द करणेसाठी सबळ, पुरेसा व विश्वसाई नसल्याने, त्यावर विसंबून आरोपीस दोषी ग्राहय धरता येणार नाही.

(१५) अभियोग पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये अभियोग पक्षास मदत होईल अशी कोणतीही कबुली साक्षीदाराने दिलेली नाही.

(१६) यापुर्वी वर नमूद केल्याप्रमाणे, खबरी व इतर साक्षीदारांच्या पुराव्यातून आरोपींविरूध्द निश्चित केलेले दोषारोप सिध्द करण्यासाठी सबळ, पुरेसा व विश्वासार्ह पुरावा अभिलेखावर उपलब्ध नसल्याने तसेच दुजोरात्मक स्वरूपाचा खबरीचा पुरावा अभियोग पक्षास उपयुक्त नसल्याने तसेच पंचनामा सिध्द न झाल्याने आरोपींविरूध्द निश्चित केलेले दोषारोप शंकेपलिकडे सिध्द झाले असे ग्राहय धरता येणार नाही. या सर्व बाबींचा साकल्याने विचार करता असे निदर्शनास येते की, अभियोगपक्षाने आरोपींविरूध्द निश्चित केलेले दोषारोप शंकेपलिकडे सिध्द केलेले नाहीत. करिता आरोपींविरूध्दचा भारतीय दंड विधान, कलम १४३, १४७, ३२६, ३२५, ३२४, ३२३, ४५२, ३५४, ५०४, ५०६ सह कलम १४९ अन्वयेचा गुन्हा शाबीत होत नाही. सबब, मुद्दे क्र. १ ते १२ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविले आहे.

**मुद्दा क्र. १३ करिता:–**

(१७) मुद्दा क्र. १ ते १२ च्या नकारार्थी निष्कर्षाने हे स्पष्ट होते की, आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द झाला नाही म्हणून आरोपीं निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. खबरीने आरोपी सोबत आपसी समझोता केला त्यामुळे त्यांनी पहिली वर्दी मधील कथनाशी विसंगत साक्ष दिली. त्यामुळे त्याचे विरुध्द खोटा पुरावा दिल्याबाबत कार्यवाही करणे योग्य वाटत नाही. त्यामुळे मुद्दा क्रं. १३ करिता खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) आरोपी क्रं. १ विठ्ठल भानुदास गायकवाड, आरोपी क्र. २ रामचंद्र भानुदास गायकवाड, आरोपी क्र. ३ पार्वती रामचंद्र गायकवाड, आरोपी क्र. ४ गणेश शिवाजी फुके, आरोपी क्र. ५ किरण शिवाजी फुके, आरोपी क्र. ६ राजाराम संपती गायकवाड व आरोपी क्र. ७ चैतन्य विठ्ठल गायकवाड यांची फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) (भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २७१) नुसार भारतीय दंड विधान कलम १४३, १४७, ३२६, ३२५, ३२४, ३२३, ४५२, ३५४, ५०४, ५०६ सह कलम १४९ अन्वयेच्या गुन्हयातून दोष मुक्त करणेत येते.

२) आरोपींचे वैयक्तीक जात मुचलके व जामीनकीचे बंधपत्रे रद्द करणेत येतात.

३) प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल एक लोखंडी गज सरकारी लिलावाद्वारे विक्री करून आलेली रक्कम सरकार जमा करण्यात यावी.

४) प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल एक बजाज कंपनीची लाल रंगाची

मोटारसायकल क्र. एम. एच. १२ बी.टी. ५२४३, एक हिरो होंडा सीडी डॉन कंपनीची काळया रंगाची मोटारसायकल क्र. एम.एच. ४५ आर. ५१९१, एक टीव्हीएस स्टार कंपनीची काळया रंगाची मोटारसायकल क्र. एम. एच. ४५ एम. ८८९६ व एक होन्डा शाईन कंपनीची काळया रंगाची मोटारसायकल क्र. एम. एच. ४५ वाय. २४५ यापूर्वीच न्यायालयाच्या आदेशाने परत दिलेले असल्याने त्याबाबत कोणतेही आदेश नाही.

५) प्रस्तुत प्रकरणातील एम.आर.क्र. ४५/२०१७, ४६/२०१७ व ४७/२०१७ मधील जप्त मुद्देमाल (दोषारोपपत्रात विस्तृत वर्णन केल्याप्रमाणे) मूल्यहीन असल्याने ते अपिल कालावधीनंतर नष्ट करावे.

६) प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल काठया मूल्यहीन असल्याने ते अपील कालावधीनंतर नष्ट करावेत.

७) आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७अ (भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४८१) नुसार प्रत्येकी रुपये १५,०००/- चा जातमुचलका व जामीन कदबा देण्याबाबत आरोपीस निर्देशित करण्यात येत आहे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात टंकलिखीत व घोषीत करणेत आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by UMESH PETHE
Date: 2026.06.12 17:53:57 +0530

स्थळ : माळशिरस

**(यु. बी. पेठे)**

दिनांक : १२/०६/२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, माळशिरस,
ता. माळशिरस, जि.सोलापूर

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word as per the original Judgment.

(a) Name of the Stenographer : M. P. Gheradi.

(b) Name of the Court : Jt. C.J.J.D & J.M.F.C
Malshiras, Dist - Solapur

(c) Order signed by P.O. On : 12.06.2026

(d) Order uploaded on : 12.06.2026